# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, स्व. इंदिरागांधी भवन, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृह

**मा. स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी दि. २४/१०/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित स्थायी समिती विशेष बैठकीचे इतिवृत्त.**

मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यां चेकडील पत्र क्र . साशा/कार्या-३/नपा-२/पिठासीन अधि./मि.भा.मनपा/२०१८, दि. २८/०९/२०१८ अन्वये, मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभापती या पदावर निवड करणेसाठी डॉ. प्रशांत नारनवरे, मा. जिल्हाधिकारी, पालघर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभापती पदाची निवड करण्यासाठी बोलाविण्यात आलेली आजची विशेष बैठक दुपारी १२.०० वाजता डॉ. प्रशांत नारनवरे, मा. जिल्हाधिकारी, पालघर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली. सदर सभेस खालील स्थायी समिती सदस्य उपस्थित होते. उपस्थित सदस्यांची ओळख व खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांनी केली.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | उपस्थिती |
|---|---|---|
| १ | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | हजर |
| २ | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | हजर |
| ३ | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | हजर |
| ४ | श्रीम. निला बर्नाड सोन्स | हजर |
| ५ | श्री. श्रीप्रकाश सिंह (मुन्ना सिंग) | हजर |
| ६ | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | हजर |
| ७ | श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली | हजर |
| ८ | श्रीम. वंदना मंगेश पाटील | हजर |
| ९ | श्री. व्यास रवि वासुदेव | हजर |
| १० | श्रीम. यादव मीरादेवी रामलाल | हजर |
| ११ | श्रीम. अनिता जयवंत पाटील | हजर |
| १२ | श्रीम. दिप्ती शेखर भट्ट | हजर |
| १३ | श्रीम. वंदना विकास पाटील | हजर |
| १४ | श्रीम. तारा विनायक घरत | हजर |
| १५ | श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा | हजर |
| १६ | श्री. जुबेर इनामदार | हजर |

सर्वप्रथम महानगरपालिका सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व विशेष बैठकीचे प्रयोजन व या निवडीची प्रक्रिया उपस्थितांना समजावून सांगितली व विषयपत्रिकेवरील विषयाचे वाचन केले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण २ कलम २१ पोटकलम (१) अन्वये मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची एक वर्षाकरिता सभापती, स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत.

निर्धारित कार्यक्रमानुसार सोमवार दिनांक २२/१०/२०१८ रोजी दुपारी ३.०० ते ५.०० वाजेपर्यंत स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी महानगरपालिका सचिव यांचेकडे प्राप्त झालेले २ नामनिर्देशन पत्रे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी मा. महानगरपालिका सचिव यांनी मा. पिठासीन अधिकारी यांच्याकडे दिनांक २४/१०/२०१८ रोजी दुपारी १२.०३ वाजता सादर केली. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. व्यास रवि वासुदेव | श्री. शाह राकेश रतिशचंद्र | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ |
| २ | श्रीम. वंदना विकास पाटील | श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा | श्रीम. तारा विनायक घरत |

तद्नंतर मा. पिठासीन अधिकारी यांनी प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्र उपस्थितांसमोर वाचून दाखवले. नामनिर्देशन पत्राच्या छाननीचे काम दुपारी १२.०३ वाजता सुरु झाले.

1. सर्वप्रथम श्री. व्यास रवि वासुदेव यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्री. व्यास रवि वासुदेव यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्य श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांनी स्वाक्षरी केली आहे. व अनुमोदक म्हणून श्री. म्हात्रे मोहन गोपाळ यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांच्यामार्फत करण्यात आली. छाननी पुर्ण झाल्यानंतर या नामनिर्देशनपत्रावर कोणाची हरकत आहे किंवा कसे याबाबत उपस्थितांना विचा रणा करण्यात आली. उपस्थितांपैकी कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे श्री. व्यास रवि वासुदेव यांचे नामनिर्देशनपत्र छाननीअंती वैध ठरविणेत आले.
2. श्रीम. वंदना विकास पाटील यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्रीम. वंदना विकास पाटील यांच्या नामनिर्देशन पत्रा वर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्य श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणून श्रीम. तारा विनायक घरत यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांच्यामार्फत करण्यात आली. छाननी पुर्ण झाल्यानंतर या नामनिर्देशनपत्रावर कोणाची हरकत आहे किंवा कसे याबाबत उप स्थितांना विचारणा करण्यात आली. उपस्थितांपैकी कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे श्रीम. वंदना विकास पाटील यांचे नामनिर्देशनपत्र छाननीअंती वैध ठरविणेत आले.

वरीलप्रमाणे दोन उमेदवारांचे दोनही अर्ज वैध करण्यात आले. छाननी अंती वैध उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १ | श्री. व्यास रवि वासुदेव |
| २ | श्रीम. वंदना विकास पाटील |

अशा प्रकारे छाननीचे काम दुपारी १२.०३ मि. सुरु करुन दुपारी १२.०८ मिनीटांनी संपविण्यात आले. त्यानंतर पीठासीन अधिकारी यांनी महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती निवडणूक घेणे ) नियम २००७ मधील नियम ५(३) अन्वये ज्या कोणत्या उमेदवारास आपले नामनिर्देशन पत्र मागे घ्यावयाचे असेल त्यांनी दुपारी १२.०९ ते १२.२४ या १५ मिनिटाच्या कालावधीत लेखी नोटीस देवून नामनिर्देश पत्र मागे घेता येईल असे जाहिर केले.

दिलेल्या मुदतीमध्ये उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतलेली नाही . त्यामुळे दोन उमेदवार रिंगणात राहिलेले आहेत.

उमेदवार दोन शिल्लक असल्याने नियम ६ (२) प्रमाणे उमेदवाराची नावे वर्णानुक्रमे लावणे आवश्यक असुन, वर्णानुक्रमे नावे पुढीलप्रमाणे आहेत.

१) श्रीम. वंदना विकास पाटील

२) श्री. व्यास रवि वासुदेव

" सभापती " पदाच्या निवडणुकीसाठी दोन उमेदवार शिल्लक राहिले आहेत . सभापती पद हे एकच असल्याने व उमेदवार दोन शिल्लक राहिल्याने नियम ६ (३) प्रमाणे "हात वर" करुन मतदान घेण्यात येत आहे. प्रथम उमेदवार श्रीम. वंदना विकास पाटील यांना ज्यांना मत द्यावयाचे आहे त्यांनी हात वर करुन आपले मत नोंदवावे , असे पिठासीन अधिकारी यांनी सांगितले . तेव्हा श्रीम. वंदना विकास पाटील यांना खालील सदस्यांनी हात वर करुन आपले मत नोंदविले.

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | श्रीम. अनिता जयवंत पाटील |
| २ | श्रीम. दिप्ती शेखर भट्ट |
| ३ | श्रीम. वंदना विकास पाटील |
| ४ | श्रीम. तारा विनायक घरत |
| ५ | श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा |
| ६ | श्री. जुबेर इनामदार |

दुसरे उमेदवार श्री. व्यास रवि वासुदेव यांना ज्यांना मत द्यावयाचे आहे त्यांनी हात वर करुन आपले मत नोंदवावे , असे पिठासीन अधिकारी यांनी सांगितले . त्यानंतर श्री. व्यास रवि वासुदेव यांना खालील सदस्यांनी हात वर करुन आपले मत नोंदविले.

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल |
| २ | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम |
| ३ | श्री. व्यास रवि वासुदेव |
| ४ | श्रीम. यादव मीरादेवी रामलाल |

| | |
|---|---|
| ५ | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ |
| ६ | श्री. राकेश रतिशचंद्र शाह |
| ७ | श्रीम. निला बर्नाड सोन्स |
| ८ | श्री. श्रीप्रकाश सिंह (मुन्ना सिंग) |
| ९ | श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली |
| १० | श्रीम. वंदना मंगेश पाटील |

हात वर करुन मतदान घेतले असता १) श्रीम. वंदना विकास पाटील यांना ०६ इतकी मते व २) श्री. व्यास रवि वासुदेव यांना १० इतकी मते मिळाली. तसेच ०० सदस्य तटस्थ राहिले.

या दोन्ही उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते श्री. व्यास रवि वासुदेव यांना मिळाल्याने ते सभापती, स्थायी समिती पदी बहुमताने निवडून आल्याचे नियम ६ (७) अन्वये पिठासीन अधिकारी यांनी घोषीत केले.

निवडणूकीबाबत सर्व अभिलेख महापालिका सचिव , मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सादर करण्यात आले. अभिलेख्यांच्या प्रमाणित प्रतींची मागणी केल्यावर त्या संबंधितांना देण्याबाबत महापालिका सचिवांना निर्देश देण्यात आले . सभेच्या पूर्ण कामकाजाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले . तद्नंतर उपस्थितांचे आभार मानून विशेष बैठकीचे कामाकाज दुपारी १२.३२ वाजता संपल्याचे जाहिर केले.

सही/-
(डॉ. प्रशांत नारनवरे)
पिठासीन अधिकारी
तथा
जिल्हाधिकारी, पालघर
स्थायी समिती सभापती निवडणूक २०१८
मिरा भाईंदर महानगरपालिका

दिनांक :- २४/१०/२०१८
स्थान :- मुख्य कार्यालय, स्व. इंदिरागांधी भवन,
दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री
सभागृह, मिरा भाईंदर महानगरपालिका